## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

७

बुधवार दिनांक १४ मे १९९७ रोजी झालेल्या मंडळाच्या ४४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

.........

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ४४ वी बैठक दि. १४ मे १९९७ रोजी दुपारी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली.

या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | ॲडव्होकेट श्री मधु चव्हाण, | सभापती. |
| २. | श्री अरविंद रेळे. | सदस्य. |
| ३. | ,, विनोद खोपकर. | ,, |
| ४. | ,, चंद्रकांत विश्वासराव. | ,, |
| ५. | ,, अमोद उसपकर. | ,, |
| ६. | ,, भालचंद्र ठाकूर. | ,, |
| ७. | ,, दगडू सकपाळ. | ,, |
| ८. | ,, प्रकाश भूवड. | ,, |
| ९. | ,, दिलीप गोडांबे. | ,, |
| १०. | ,, गणेश तिकोने. | ,, |
| ११. | डॉ. विनोद मेहता. | ,, |
| १२. | श्री अभय सावरकर. | ,, |
| १३. | प्रमुख अभियंता म.न.पा. यांचे प्रतिनिधी, | निमंत्रक |
| १४. | उपकर निर्धारक व संकलक [शहरे], म.न.पा. | ,, |

मा. सभापती यांनी बैठकीच्या सुरवातीस उपस्थित सर्व सन्माननीय सदस्य व अधिकाऱ्यांचे स्वागत करून अशी माहिती दिली की, आज मा. मुख्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी मुख्य अधिकारी यांना एका बैठकीस मंत्रालयात बोलाविल्यामुळे ते आजच्या बैठकीस उपस्थित राहू शकणार नसल्याचे त्यांनी कळविले आहे. मा. सभापती यांनी सचिव श्री गद्रे यांना बैठकीचे कामकाज सुरु करण्याबाबत सूचना दिल्या.

सचिव श्री गद्रे यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकाऱ्यांचे स्वागत करून बैठकीस सुरवात केली.

बाब क्रमांक : ४४.१

विषय- मुं.इ.दु.व.पु. मंडळाची बुधवार दि. ९.४.९७ रोजी संपन्न झालेल्या ४३व्या बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करणेबाबत.

3BC



2

मुं. इ. दु. व. पु. मंडळाच्या बुधवार दिनांक-९. ४. ९७ रोजी संपन्न झालेल्या ४३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ. क्र. १ ते ६५ वर सादर करण्यात आला आहे. यावर चर्चा करताना मा. सदस्य श्री उतपकर यांनी पृ. क्र. १७ वर सुधारणा करण्याची गरज असल्याचे निदर्शनास आणले. कार्यवृत्तांतामध्ये असे नमुद करण्यात आले आहे की, " जर लोकांना भाडे भरण्यास हप्ते बांधून दिले व वाढीव क्षेत्रफळासाठी कमी दर आकारण्यात आला तर तो एक पायंडा पडेल" तरी ह्याऐवजी सदर कार्यवृत्तांत " लोकांना भाडयाचे हप्ते बांधून देण्यास हरकत नाही परंतु वाढीव क्षेत्रफळासाठी कमी दर आकारण्यात आला तर तो पायंडाच पडेल. तरी याबाबत निश्चित धोरण स्विकारावे असे वाटते " अशी नोंद घेण्यात यावी अशी सूचना मा. सदस्य श्री उतपकर यांनी केली. त्याप्रमाणे कार्यवृत्तांत नोंद घेण्यास मा. सभापती यांनी सूचना दिल्या.

सविस्तर चर्चेअंती मा. सदस्य श्री उतपकर यांनी केलेल्या सूचनेची नोंद घेऊन ४३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

---

[ब] विषय- मुं. इ. दु. व. पु. मंडळाची बुधवार दि. २३ एप्रिल ९७ रोजी संपन्न झालेल्या ४३ व्या जोडबैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

.........

मुं. इ. दु. व. पु. मंडळाची बुधवार दि. २३. ४. ९७ रोजी संपन्न झालेल्या ४३ व्या जोड बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ. क्र. ६७ ते ११९ वर सादर करण्यात आला आहे.

सदर कार्यवृत्तांतावर चर्चा करण्यापूर्वी सचिव श्री गद्रे यांनी असे निदर्शनास आणले की, मागील ४३ व्या जोड बैठकीत पृ. क्र. १७९ ते १८७ वर दक्षिण परिमंडळाची २९ अंदाजपत्रके मंजूरीसाठी सादर करण्यात आली होती. सदर अंदाजपत्रकांवर सविस्तर चर्चा होऊन सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या सूचनांच्या आधारे सदर अंदाजपत्रके मंजूर करण्यात आली होती परंतु त्यांच्या प्रती कार्यवृत्तांतामध्ये जोडावयाच्या अनावधनाने राहील्या होत्या. त्या प्रती सर्व सन्मा. सदस्यांना आता देण्यात येत असून त्यांनी कार्यवृत्तांताचाच भाग समजावा, अशी विनंती केली. त्यास मा. सभापती व सन्मा. सदस्यांनी सहमती दर्शवून त्याची नोंद घेण्यात आली.

मा. सभापती यांनी सूचना केली की, ज्या वास्तुशास्त्रज्ञांच्या विरुध्द कारवाई करण्यात आली आहे त्यांच्या नांवाची यादी सर्व सन्मा. सदस्यांना अजंठाबरोबरच देण्यात यावी अशा सूचना संबंधित उपमुख्य अभियंता [द. ] व [उ. ] यांना दिल्या. म्हणजे मा. सदस्यांना त्यांच्या भागातील कोणता वास्तुशास्त्रज्ञ ब्लॅकलिस्टेड आहे हे समजून येईल. किंवा सदर यादी सभापती यांजकडे दिल्यास ते त्यांच्या पत्रासोबत यादी सर्व सन्मा. सदस्यांना देतील.

मा. सदस्य श्री भालचंद्र ठाकूर यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत मा. सभापती यांनी माहिती दिली की, संक्रमण शिबीर कार्यालयातील वादग्रस्त भाडेवसुलीकार श्री गायकवाड यांची बदली करण्यात आलेली आहे.

मा. सभापती यांनी सूचना दिल्या की, सन्मा. सदस्यांनी लक्षात आणून दिल्याप्रमाणे त्रुटींची नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवृत्तांत सुधारणा करण्यात यावी.

सविस्तर चर्चेअंती ४३ व्या जोड बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

---

बाब क्रमांक : ४४.२

विषय- अनुपालन अहवाल [दक्षिण परिमंडळ]

सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत दक्षिण परिमंडळाने खुलासेवार अनुपालन अहवाल पृ. क्र. १२१ ते १२५ वर सादर करण्यात आला आहे. सदर अनुपालन अहवालावर चर्चा करताना श्री वणीकर, उपमुख्य अभियंता यांनी उपस्थितांच्या असे निदर्शनास आणून दिले की, अजंठामधील अंदाजपत्रकांपैकी सुमारे ८० ते ८५ टक्के अंदाजपत्रकांच्या बाबतीत दि. ३१. ३. ९६ पर्यंत उपकर भरण्यात आलेला आहे परंतु काही अंदाजपत्रके अशी आहेत की, दि. ३१. ३. ९५ पर्यंत उपकर भरलेला आहे. सदर उपकर पूर्ण भरण्याच्या दृष्टीने अधिकारीवर्ग पाठपुरावा करीत आहे. परंतु त्यातही काही तांत्रिक अडचणींमुळे उशीर होतो. त्यांनी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती केली की, दि. ३१. ३. ९५ पर्यंत उपकर भरलेल्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यास हरकत नाही.

मा. सभापती यांनी याबाबत अधिक स्पष्ट करताना असे निदर्शनास आणले की, इमारतीच्या दुरूस्तीचे अंदाजपत्रक सादर करण्याआधी एक वर्ष त्या इमारतीचा दुरूस्ती उपकर भरलेला असला पाहिजे व त्याबाबतची खात्री संबंधित अधिकाऱ्यांनी करून अशा अंदाजपत्राके बैठकीत ठेवण्यात यावीत, अशी विनंती उपमुख्य अभियंता [द. ] यांनी केली आहे. परंतु कार्यवृत्तांत ६ महिने आधी उपकर भरलेला असला पाहिजे असे जे नमूद करण्यात आले आहे त्याऐवजी "एक वर्ष आधी उपकर भरलेला असावा " अशी दुरूस्ती करावी. याबाबत मा. सभापती यान्नी उपमुख्य अभियंता [द. ] श्री वनीकर यांना त्यांनी केलेल्या सूचनांचे एक पत्र बाब टिपणीसहीत मुख्य अधिकारी व सभापती यांना द्यावे म्हणजे पुढील बैठकीत सदर बाब अधिकृतपणे मंजूर करून घेता येईल.

वरील चर्चेनंतर सर्वानुमते दक्षिण परिमंडळाचा अनुपालन अहवाल मंजूर करण्यात आला.

बाब क्रमांक : ४४.३

विषय- उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्ती कामाचे मुळ व सुधारित नकाशांना व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

.......

उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरूस्ती कामाच्या मुळ आणि सुधारित अंदाजपत्रकांना व नकाशांना मंजूरी मिळण्यासाठी प्रस्ताव पृ.क्र. उ-१ ते उ-७३ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापती यांनी माहिती दिली की, मंडळास शासनाकडून ३१ कोटी ५० लाख मिळतील असे गृहीत धरुन या वर्षासाठी तरतुद अंदाजपत्रकात करण्यात आली होती. परंतु तेवढी रक्कम न मिळता केवळ १२ कोटी रुपयेच मिळणार असे कळल्यावरुन १२ कोटी रुपये मिळतील हे गृहीत धरुन अंदाजपत्रके तयार करावीत असा मागील बैठकीत निर्णय घेण्यात आला होता. दि. ९.४.९७ रोजी झालेल्या ४३ व्या बैठकीत अंदाजपत्रके मंजूर करण्यात आली नव्हती परंतु तपासणीनंतर ४३ व्या जोड बैठकीत २ कोटी ९७ लाख ७० हजार रुपयांची ४७ अंदाजपत्रके मंजूर करण्यात आली होती व आजच्या ४४ व्या बैठकीमध्ये ५४ अंदाजपत्रके सादर करण्यात आली आहेत. त्या अंदाजपत्रकांची एकूण किंमत २ कोटी १२ लाख ५ हजार रुपये एवढी येते. म्हणजेच एकूण ५ कोटी ९ लाख रुपयांची अंदाजपत्रके मंजूर करण्यात आली आहेत. मंडळास १२ कोटी रुपये मिळणार असे जर गृहीत धरले तर वर्षभरासाठी असलेली तरतुद लक्षात घेता मंडळाने २४ टक्के रक्कम दोन महिन्यात पूर्ण केलेली आहे. आणि आजच्या बैठकीमध्ये ५४ अंदाजपत्रके मंजूर केली तर तरतुदीपैकी ४२.४८ टक्के रक्कम वापरली जाईल. परंतु ३१कोटी रक्कम मंडळास मिळाली तर त्या रक्कमेच्या १६ टक्केच रक्कम वापरली जात आहे.

यावर उपमुख्य अभियंता श्री वनीकर यांनी माहिती दिली की, मंडळास ३१ कोटी रुपये खर्च करावयाचे आहेत. संपूर्ण खर्च याच वर्षात होईल असे नाही. उदा. एक कोटी रुपयांपैकी साधारणत: ३० टक्केच रक्कम या वर्षात खर्च होईल. कारण निविदा मागवून कामे सुरु करीपर्यंत बराच कालावधी जातो. उर्वरित रक्कम पुढच्या वर्षी वापरली जाते.

सचिव श्री गद्रे यांनी असे निदर्शनास आणले की, एप्रिल-९७ अखेर मंडळाचे ९ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. गेल्या वर्षी किंवा त्या आधी जी अंदाजपत्राके मंजूर झालेली आहेत ती यावेळच्या अंदाजपत्रकात धरुन १२ कोटी रुपये होतात. ती यामध्ये कव्हर होतात. सदर प्रक्रिया नियमित असल्यामुळे नियंत्रण ठेवण्याचेदृष्टीने लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, जरी अंदाजपत्रके मंजूर केली तरी

अधिका-यांनी माहिती दिल्याप्रमाणे निविदा मागविणे, वर्क ऑर्डर देणे, प्रत्यक्ष कामास सुरवात करणे, बिले पास करणे इत्यादी प्रक्रियेसाठी वेळ लागतो. पावसाळा अधिवेशनापूर्वी शासन मंडळाला सुकथनकर समितीच्या अहवालाप्रमाणे ५० कोटी रुपये किंवा जेवढा उपकर गोळा होतो यापैकी जे जास्त असेल ते देतात किंवा कसे याबाबतचे चित्र स्पष्ट होईल.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे निदर्शनास आणाले की, पावसाळा जवळ आलेला असल्यामुळे धोकादायक इमारतींची दुरुस्ती तातडीने करुन घेतली पाहीजे. यावर मा. सभापती यांनी अशा इमारतींना पहिले प्राधान्य देऊन धोकादायक इमारतींची दुरुस्ती करुन घेतली जाईल असे आश्वासन दिले.

मा. सदस्य श्री अभय सावरकर यांनी असे निदर्शनास आणाले की, मागील बैठकीत जी अंदाजपत्राके पुढे ढकललेली होती ती त्या अंदाजपत्रकातील इमारतींची कामे न करण्यासाठी नाही तर सादर करण्यात आलेली अंदाजपत्राके तपासून प्राधान्याने कोणती अंदाजपत्राके मंजूर करणे आवश्यक आहे हे ठरविण्यासाठी. परंतु आजच्या कार्यसूचीवरुन असे दिसून येते की, ती अंदाजपत्रके पुन्हा सादर करण्यात आलेली नसून इतर आणखी अंदाजपत्राके सादर करण्यात आली आहेत. यावर उपमुख्य अभियंता [उत्तर] श्री भूवनदास यांनी खुलासा केला की, पावसाळयापूर्वीच्या सर्वेक्षणामधील आढळलेल्या धोकादायक इमारतींची कामे प्राधान्याने करावयाची असल्याने ती सादर करण्यात आली आहेत.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, उत्तर परिमंडळाची एकूण ११ अंदाजपत्राके मंजूरीसाठी सादर करण्यात आलेली आहेत.

मा. सदस्य श्री भालचंद्र ठाकूर यांनी पृ. क्र. उ-११ वर वाढीव क्षेत्रफळातील तफावत ५.६५ ने वाढल्याचे निदर्शनास आणाले. यावर चर्चा करताना मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, या चाळीत ६ खोल्या जास्त वाढलेल्या आहेत. त्याबाबत संबंधित वास्तुशास्त्रज्ञाकडून खुलासा मागविण्यात आला आहे. परंतु ७ महिने होत आले तरी त्याने खुलासा दिलेला नाही. मग त्या वास्तुशास्त्रज्ञाला स्मरणपत्र का पाठविले नाही? अशी संबंधित कार्य. अभि. श्री महाजन यांचेकडे विचारणा केली. त्यानी पुढे असेही निदर्शनास आणाले की, जर मंडळाने वाढीव ६ खोल्या नियमित केल्या तर त्याचा दोष मंडळावर येईल. तरी अशा वास्तुशास्त्रज्ञांचा नुसता खुलासा मागवून वाट न पहाता संबंधित अधिका-यांनी पुढील कार्यवाही करुन त्यांच्यावर नियंत्रण ठेवावे, अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री खोपकर यांनी असे मत व्यक्त केले की, जर पूर्वी दोन खोल्या होत्या तर त्या मागच्या वेळेस सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकात का दाखविण्यात आल्या नव्हत्या. याबाबत संबंधित कार्यकारी अभियंता श्री महाजन यांनी खुलासा केला.

सदर बाबत अधिक खुलासेवार माहिती देताना सचिव श्री गद्रे यांनी सांगितले की, कोणत्याही कामाकरिता जेव्हा वास्तुशास्त्रज्ञ नेमला जातो तेव्हा संबंधित

इमारतीच्या आधीच्या टप्प्यामध्ये जी कामे केलेली असतात त्याबाबतची माहिती त्यावेळच्या प्लॅन एस्टीमेटमध्ये उपलब्ध असते व ही प्लॅन एस्टीमेट फाईलमध्ये उपलब्ध असतात. जेव्हा जुन्या प्लॅनच्या आधारे पुन्हा तपासणी केली तेव्हा क्षेत्रफळामधील फरक दिसून आला. क्षेत्रफळाचे जे ब्लॉक प्लॅन असते ते महसुल विभागाकडून मिळते. आताच्या अंदाजपत्रकामध्ये तपासणीनंतर दिसून आलेला क्षेत्रफळातील फरक दाखविणे आवश्यक असल्यामुळे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी वाढलेले क्षेत्रफळ दाखविलेले आहे.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी यावर असे मत मांडले की, वाढीव क्षेत्रफळ ७७ चौ. मी. म्हणजे जवळ जवळ ८०० चौ. फू. आहे. जर एवढी जागा पूर्वी होती तर त्यावेळच्या अंदाजपत्रकात का दाखविली नाही. तसेच मंडळाच्या अधिका-यांनीही ही बाब का लक्षात आणून दिली नाही?

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, वाढीव क्षेत्रफळ बेकायदेशीर आहे की, ते मुळचेच आहे. जर क्षेत्रफळ मुळचेच असेल तर दुस-या टप्प्याचे अंदाजपत्रकात दाखविण्यात का आले नाही. त्याबद्दल त्यावेळच्या वास्तुशास्त्रज्ञाला खुलासा विचारला होता का?

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी अशी विचारणा केली की, जेव्हा वास्तुशास्त्रज्ञ अंदाजपत्रक बनवितो आणि विभागीय कार्यालयाकडे सादर करतो तेव्हा मंडळाचे विभागीय अधिका-यांनी वास्तुशास्त्रज्ञाने दिलेला नकाशा बरोबर आहे किंवा नाही ते जागेवर जाऊन तपासले पाहीजे.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, सदर इमारतीचे पहिल्या व दुस-या टप्प्याचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले तेव्हा दोन्ही वेळा अंदाजपत्रकात १३७३ चौ. फू. क्षेत्रफळ दाखविले आहे आणि आता मात्र १४५१ चौ. फू. दाखविले आहे. याचा अर्थ पूर्वीचे दोन्ही वास्तुशास्त्रज्ञ डोळे बंद करुन ब्लॉक प्लॅन बघत होते काय? कारण १९७४-७५ साली पहिल्या टप्प्याचे काम झालेले होते. तसेच १९८७-८८ साली दुस-या टप्प्यामध्ये सुध्दा १३७३ क्षेत्रफळ दाखविले होते. आता १९९७ साली मात्र १४५१ क्षेत्रफळ दाखविण्यात आले आहे.

मा. सभापती यांनी सूचना दिल्या की, वाढीव क्षेत्रफळ जर बेकायदेशीर असेल तर ते अंदाजपत्रकामधून वजा करावे व योग्य ती दखल घेऊन कायदेशीर निर्णय घेण्यात यावा.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असेही निदर्शनास आणले की, या वाढीव क्षेत्रफळाचा फायदा येथील लोक सदर इमारत पुनर्रचित झाल्यावर घेतील. जरी त्यांची जुनी जागा लहान असली तरी ती मोठी असल्याचे सांगून पुनर्रचित इमारतीत मोठी जागा मागतील.

यावर सचिव श्री गद्रे यांनी असे सुचविले की, आता जुने क्षेत्रफळ गृहीत धरुन अंदाजपत्रक मंजूर करावे आणि वाढीव नवीन क्षेत्रफळ हे पूर्वीपासूनच होते असे सिध्द

साठी सादर करावे.
झाल्यास सुधारित अंदाजपत्रक नंतर मंडळाच्या मंजूरी , या मताशी सर्वांनी सहमती दर्शवून अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

मा. सदस्य श्री रेळे यांनी पृ. क्र. २१ वरील अंदाजपत्रकाबाबत चर्चा करताना असे निदर्शनास आणले की, सदर इमारतीचा उपकर ३०. ९. ९३ पर्यंतच भरलेला आहे. यावर खुलासा करताना उपमुख्य अभियंता [उत्तर] श्री. भूवनदास यांनी सांगितले की, सदर इमारतीची पहाणी त्यांनी स्वत: केली असून भाडेकरूंनी घर मालकास आजपावेतो भाडे भरलेले आहे तसेच सदर इमारतीतील एका खोलीचे सिलींग पडलेले आहे. तरी सदर अंदाजपत्रक मंजूर करावे अशी विनंती केली.

सविस्तर चर्चेअंती सदर अंदाजपत्राकास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

मा. सदस्य श्री प्रकाश भूवड यांनी २४-२६, जेल रोड या इमारतीचा जो तुलनात्मक तक्ता दिलेला आहे त्यामध्ये अतिरिक्त बाबींसाठी रु. ५३,०००/- दाखविण्यात आले आहेत असे सांगून अतिरिक्त बाबी म्हणजे काय? याचा खुलासा करण्यात यावा अशी विचारणा केली.

यावर खुलासा करताना संबंधित अधिकारी उपमुख्य अभियंता श्री भूवनदास यांनी माहिती दिली की, एखादा जरुरी कामाचा मूळ निविदेमध्ये समावेश नसेल परंतु ते जर करण्याची गरज असेल तर ते अतिरिक्त बाब या सदरात मोडते.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, या इमारतीचा उपकर १९९२ पर्यंतच भरलेला आहे. तरी तो अद्यावत भरुन घेण्यात यावा अशी सूचना केली.

मा. सदस्य श्री दगडू सकपाळ यांनी असेही निदर्शनास आणले की, अंदाजपत्रके सादर करण्यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांनी तपासून पहावीत. कारण बऱ्याच अंदाजपत्रकात तारखा लिहिलेल्या नाहीत, बऱ्याच ठिकाणी किंमतीही लिहिलेल्या नाहीत.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने उत्तर परिमंडळातील खालील चार अंदाजपत्राके व नकाशे अत्यंत तातडीचे असल्याने मंजूर करण्यासाठी सर्व सन्मा. सदस्यांना सादर केली.

१] इ. क्र. ८९८, ग्लोब मिल पॅसेज, फग [दक्षिण].

२] इ. क्र. १९-११-ई, भायखळा स्टेशन रोड, ई-२.

३] खिमजी चाळ क्र. २, तुळसी पाईप रोड, फग [दक्षिण].

४] इ. क्र. २-६, एलफीन्स्टन रोड, समर्थ निवास, फद-गद.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील सादर करण्यात आलेली १९ अंदाजपत्रके तसेच मा. अध्यक्षांच्या परवानगीने सादर करण्यात आलेली चार अंदाजपत्रके सर्वानुमते मंजूर करण्याचे ठरले.

९५

ठराव क्रमांक : ४४/३५८
==================

उत्तर परिमंडळातील मंजूरीसाठी सादर करण्यात आलेली परिशिष्ट "अ" मधील अंदाजपत्रके सन्मा. सदस्यांनी केलेल्या सूचना व घेतलेल्या हरकतींची नोंद घेऊन, अंदाजपत्रकात करावयाच्या आवश्यक त्या सुधारणा करण्याचे गृहीत धरून सर्वानुमते मंजूर करण्यात आली.

---

बाब क्रमांक : ४४.४ [दक्षिण परिमंडळ]
================

विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरूस्ती कामाचे मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

.........

दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरूस्ती कामाचे मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी पृ.क्र. द-१ ते द-१२१ वर सादर करण्यात आली आहेत.

वरील प्रस्तावावर चर्चा करताना मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, पृ. क्र. द-१ वर जो दक्षिण परिमंडळाच्या अंदाजपत्रकांचा गोषवारा सादर करण्यात आला आहे त्या गोषवाऱ्यामध्ये शेऱ्याच्या कॉलममध्ये कोणत्या विभागाचे किती रक्कमेचे काम झालेले आहे, किती रक्कम शिल्लक आहे ती ~~रक्कम~~ दर्शविण्यात यावी.

यावर मा. सभापती यांनी सूचना दिल्या की, प्रत्येक कार्यकारी अभियंता यांनी माहिती द्यावी की, त्यांच्या विभागासाठी किती तरतुद करण्यात आली आहे तसेच मंजूर रक्कमे पैकी किती काम झाले किती रक्कम शिल्लक आहे याबाबतची माहिती गोषवाऱ्यामध्ये देण्यात यावी.

इ.क्र.२९, पोलीस कोर्ट लेन, बाबत चर्चा करताना उपमुख्य अभियंता [द.] श्री वनीकर यांनी निदर्शनास आणले की, त्यांनी सदर इमारतीस भेट दिली असून इमारत धोकादायक स्थितीत आहे, भाडेकरूंनी त्यांच्या हिश्याची अधिकची रक्कम भरल्यावर दुरूस्ती कामास सुरवात करण्यात येईल अन्यथा ती पाडून टाकण्यात येईल. तरी सदर अंदाजपत्रक मंजूर करावे अशी विनंती केली.

यावर मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, भाडेकरूंनी अधिक भरावयाच्या रक्कमेपैकी ५० टक्के रक्कम भरल्याखेरीज कामास सुरवात करण्यात येऊ नये. या मतास सर्वांनी सहमती दर्शविली.

९७

पृ.क्र. द–४१ वरील इ.क्र. ४६, अ, ४६–बी, तांडेल स्ट्रीट [उत्तर] बाबत चर्चा करताना उ.मु.अभि. [द.] यांनी असे निदर्शनास आणून दिले की, सदर इमारतीचा दुरुस्ती उपकर दि. ३१.३.९६ पर्यंत भरलेला आहे व त्याची त्यांनी खात्री केली आहे.

मा.सदस्य श्री उसपकर यांनी पृ.क्र.द–६३ वर इ.क्र. ४६८–४७८, सरदार वल्लभभाई पटेल रोड या इमारतीचे कुजलेले लाकडी खांब व तुळया काढून लोखंडी खांब व तुळया बदली करणे रु. १,८९,३८८/– बाबत असे सूचीत केले की, संबंधित अधिकारीवर्गाने त्याबाबत खात्री करुन घ्यावी की, सदर लाकडी खांब, तुळया कुजलेले आहेत किंवा कसे ततेच नष्ट शोषाची गणणासुध्दा योग्य प्रकारे आहे किंवा कसे हे पडताळून पहावे.

पृ.क्र. द–७१ वरील क्षेत्रफळातील फरकाबाबत मा.सदस्य श्री उसपकर यांनी विचारलेल्या मुद्दयाबाबत उ.मु.अभि. [द.] श्री वनीकर यांनी शे–यामधील दिलेला खुलासा विस्तृत करुन सांगितले. यावर मा.सभापती यांनी उ.मु.अभि. [दक्षिण] यांना सदर वास्तुशास्त्रज्ञ यांना स्मरणपत्र पाठविण्याच्या सूचना दिल्या.

चर्चेच्या ओघाओघात मा.सदस्य श्री उसपकर यांनी मा.सभापती यांना विनंती केली की, त्यांना डी–२ विभागाच्या काही इमारतींना भेट द्यावयाची आहे. त्यास मा.सभापतींनी सहमती दर्शविली.

पृ.क्र. १०५ वरील इमक्र. १९०–अ, डॉ. भडकमकर मार्ग या इमारतीच्या अंदाजपत्रकावर चर्चा करताना मा.सदस्य श्री भूवड यांनी चिकन मेश व गनायटिंग यामधील फरक विचारला असता उ.मु.अभि. [द.] श्री वनीकर यांनी सदर फरकाची संक्षिप्त माहिती सभागृहास दिली.

मा.सदस्य श्री उसपकर यांनी पृ.क्र. ११९ वरील अंदाजपत्रक कोणत्या टप्प्याचे आहे ते नमुद केलेले नसल्याचे निदर्शनास आणले.

मा.अध्यक्षांच्या परवानगीने दक्षिण परिमंडळातील निकडीची खालील तीन अंदाजपत्रके सर्व सन्मा.सदस्यांना सादर केली.

१] इ.क्र. ३३३, काळबादेवी रस्ता – सी–३/सी–४.

२] इ.क्र. १२, निकतवारी लेन, डी–१.

३] इ.क्र. ६, निकतवारी लेन, डी–१.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील सादर करण्यात आलेली मुळ अजेंडामधील व मा.अध्यक्षांच्या परवानगीने सादर केलेली अंदाजपत्रके सर्वानुमते मंजूर करण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ४४/३५९.

दक्षिण परिमंडळातील परिशिष्ट– "ब" मधील दुरुस्ती कामाच्या सर्व अंदाजपत्रकांना सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या सूचना व हरकतींच्या आधीन राहून मान्यता देण्यात आली.

१९

मा. सभापती यांनी माहिती दिली की, पुनर्रचित गाळे विभाग व संक्रमण गाळे विभाग ह्या कार्यालयांकडून रिक्त व घुसखोरी झालेल्या गाळयांबाबत माहीती असलेला तक्ता सादर करण्यात आला आहे.

यावर मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी सूचना केली की, सक्षम प्राधिकारी यांजकडे प्रलंबित असणारी प्रकरणे किती वर्षांपासून प्रलंबित आहेत याची माहिती देण्यात यावी. याबाबत मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, सक्षम प्राधिकारी व अपिल अधिकारी यांच्याबद्दल त्यांनी स्वत: मा. मुख्य मंत्री व संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार केलेली असून ह्या अधिकाऱ्यांचे काम अतिशय असमाधानकारक असल्याचे कळविले आहे. ह्या अधिकाऱ्यांकडे दहा-दहा वर्षे प्रकरण चालू असते.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी सूचना केली की, १२६ प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्याचे दाखविण्यात आले आहे. ही न्यायालयीन प्रकरणे लवकरात लवकर निकालात निघण्यासाठी विधी शाखेने प्रयत्न केले पाहीजेत. कारण लाखो रुपयांची मालमत्ता घुसखोरांनी अडवून ठेवलेली आहे. तसेच पुढे त्यांनी निव्वळ घुसखोरांबाबत खुलासा करण्यात यावा अशी विनंती केली. यावर उपमुख्य अधिकारी श्री तेरदाळकर यांनी खुलासा केला की, मंदार निकेतन, गुरुसदन ह्या इमारतीच्या जवळपास दहशतीचे वातावरण असून गाळयांमधून घुसखोरांना काढून टाकल्यानंतर पुन्हा पुन्हा त्या गाळयांत घुसखोरी केली जाते.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, बृहत्सूचीवरील लोकांना भायखळा परिसरातील गुरुसदन, जगत्स्मृती, मंदार निकेतन या इमारतींमध्ये वितरण केले होते. परंतु ते लोक या इमारतींत रहावयास जाण्यास तयार नाहीत. त्यामुळे गाळे रिक्त रहातात व तेथील लोक त्या गाळयांचा बेकायदेशीरपणे वापर करतात. म्हणून आता बृहत्सूचीवरील लोकांना सक्तीने असे गाळे घ्यावयास लावण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री तकपाळ यांनी असे निदर्शनास आणले की, गाळे वितरीत केलेले लोक जेव्हा त्या इमारतीत रहावयास जातात तेव्हा तेथील लोक त्यांना घाबरवतात व अशा लोकांना रहाणेही मुष्कील झालेले आहे ही वस्तुस्थिती आहे.

मा. सदस्यांच्या या म्हणण्यास मा. सभापती यांनी दुजोरा देऊन सांगितले की, पोलीसांच्या मदतीने बृहत्सूचीवरील लोकांना गाळयांचे ताबे दिल्यानंतर तेथील लोक या लोकांना छळतात व खोली सोडून निघून जाण्यासाठी धमकावतात. त्यामुळे लोक तेथे रहावयास मागत नाहीत. यावर उपाययोजना सुचविण्यासाठी शासनालाही एक पत्र लिहिण्यात आले आहे.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी गुलमोहर या इमारतीतही घुसखोर असून त्यांनी लिफ्टच्या ठिकाणी त्यांची कार्यालये थाटलेली आहेत अशी माहिती देऊन ह्या इमारतीचे नाव तक्त्यात नसल्याचे निदर्शनास आणले.

यावर मा. सभापती यांनी श्री तेरदाळकर यांना सूचना दिल्या की याबाबत तपासणी करुन घ्यावी व सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे वस्तुस्थिती असेल तर त्वरित संबंधितांवर कारवाई करण्यात यावी.

मा. सभापती यांनी विधी सल्लागार/प्राधिकरण श्री वाचासुंदर यांना पुनर्रचित इमारतींबाबत न्यायालयात जी १२६ प्रकरणे आहेत त्याबाबत सभागृहास माहिती देण्यात यावी. यावर श्री वाचासुंदर, वि. स./प्रा. यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाचे मा. न्यायाधीश श्री दातार यांनी हल्लीच असा निर्णय दिलेला आहे की, म्हाडाच्या गाळयांत घुसखोरी करणाऱ्या व्यक्तींना कोठल्याही न्यायालयाकडून स्थगिती आणण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. सदर निर्णय १० एप्रिल १९९७ रोजी झालेला असून त्या निर्णयाच्या आधारे सध्या चालू असलेली घुसखोरांची प्रकरणे रद्द (डीसमीस) करण्यात येतील. तसेच मागील २-३ महिन्यांपासून संक्रमण शिबीरातील घुसखोरीवर लक्ष केंद्रीत करण्यात आले होते. मा. सभापती यांनी श्री तेरदाळकर यांना सूचना केली की, यापुढे त्यांनी बैठकी अगोदर सदर माहितीचा तक्ता विधी सल्लागार/प्राधिकरण यांना द्यावा म्हणजे त्यांना सद्यस्थिती विषयी माहिती मिळू शकेल.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी माहिती दिली की, राणी लक्ष्मीबाई चाळ म्हाडाने दुरुस्तीसाठी घेतली आहे, ही बाब बरोबर आहे की चूक आहे एवढेच न्यायालयाला सांगावयाचे होते. परंतु म्हाडाचे वकील न्यायालयात काहीच बोलत नसल्याने हा प्रश्न कसा सुटू शकेल ? अशी त्यांनी विचारणा केली. यावर मा. सभापती यांनी विधी सल्लागार/प्रा. यांना याबाबत चौकशी करण्याच्या सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी इ. क्र. ९८, तात्या घारपूरे पथ या इमारतीच्या केसे बाबत म्हाडाचे वकील फक्त तारखा मागत असतात व केस पुढे ढकलत असतात असे निदर्शनास आणून सुप्रीम कोर्टात जे प्रकरण अजून चालू आहे त्याबाबत माहिती देण्यासबाबत सूचना केली.

श्री वाचासुंदर यांनी माहिती दिली की, ९८, तात्या घारपूरे पथ बाबत ॲडीशनल ॲडव्होकेट जनरल नेमलेला असून सुप्रीम कोर्टाचे क्लॅरिफिकेशन घेण्याबाबत त्यांना सांगितले आहे. त्याप्रमाणे ताबडतोब अर्ज करुन त्यांनी दिलेला आहे.

यावर मा. सभापती यांनी विधी सल्लागार/प्रा. यांना सदर बाबत जातीने लक्ष घालून लवकरात लवकर कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे निदर्शनास आणले की, भुवनेश्वर इमारतीची केस अजूनही बोर्डावर आलेली नाही त्यामुळे लोकांवर अन्याय होत आहे. यावर विधी सल्लागार/प्रा. यांनी सांगितले की, या केसबाबत एक्स-पार्टीने स्थगिती मिळविली आहे, त्याबाबत कोणालाही त्याची कल्पना नाही. तरी आता त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री गोडांबे यांनी असे मत व्यक्त केले की, अनधिकृत बांधकामे व घुसखोरी यामुळे मंडळास प्रत्येक टप्प्यावर अडचणी येतात व मंडळाच्या चांगल्या योजनांवर त्याचा प्रतिकुल परिणाम होऊन चांगल्या कामाचा बट्ट्याबोळ होत असतो. म्हणून विधी शाखे मार्फत न्यायालयावर बंधने आणता येणे शक्य असल्यास त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी वा कायद्यात बदल करण्यात यावा.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, संक्रमण शिबीरातील घुसखोरांना सिटी सिव्हील कोर्टामधून कोणत्याही प्रकारची स्थगिती मिळत नाही. ओशिवरा येथील संक्रमण शिबीरामधून ३५ घुसखोरांना कमढल्यानंतर संध्याकाळी पुन्हा त्या गाळ्यात घुसखोरी करण्यात आली. त्यामुळे कंटेम्प्टची केस दाखल करण्यात आली आहे. अशा अनेक प्रकारच्या अडचणी येतात.

मा. सदस्य श्री भूवड यांनी कुलाबा संक्रमण शिबीरातील घुसखोरांची यादी जी मागील बैठकीत सादर केली होती त्या यादीतील किती घुसखोरांना काढून टाकण्यात आले ? अशी विचारणा केली असता मिळकत व्यवस्थापक श्री माने यांनी माहिती दिली की, मा. सदस्यांनी दिलेल्या यादीपैकी २४ लोक अनधिकृत सापडले, खोटे व बनावट कागदपत्रे सादर करुन गाळ्यांचा ताबा मिळविलेले दोन इसम आहेत.

मा. सदस्य श्री भूवड यांनी माहिती दिली की, तय्यब अली हा दलाल भेंडी बाजारातील जुन्या इमारतीतील लोकांकडे जाऊन त्यांच्या व्हेकेशन नोटीसा घेऊन कुलाबा सारख्या ठिकाणी वितरणे मिळवून घेतो. ते गाळे तो परस्पर भाड्याने देतो व करारनामा स्वत:च्याच नावे करतो.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, ज्या व्यक्तीने गाळा तय्यब अली कडून घेतल्याचे कबूल केले आहे त्याचे प्रकरण गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपविण्यात आले असून पुढील कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असे निदर्शनास आणले की, त्यांनी दिलेल्या पत्राच्या झेरॉक्स वसाहतीत काही लोकांच्या हाती पडल्याचे सांगून मंडळाच्या गोपनीय बातम्या लोकांमध्ये पसरतात ही बाब योग्य नाही. यावर मा. सभापती यांनी तसे असेल तर ती अतिशय गंभीर बाब असून श्री नाचणकर, सहमुख्य अधिकारी यांनी याबाबत चौकशी करुन ज्याने अशा प्रकारचे बेकायदेशीर कृत्य केले असेल त्याच्यावर कडक कारवाई करण्यात यावी अशा सूचना दिल्या.

तर मा. सदस्य श्री सकपाळ यांनी पुढील बैठकीत याबाबत माहिती देण्यात यावी अशी मागणी केली.

मा. सदस्य श्री भूवड यांनी किती इमारतींची पुनर्रचना करण्याचे काम चालू आहे, अशा इमारतींची माहिती पुढील बैठकीत ठेवण्यात यावी अशी मागणी केली..

२५

मा. सभापती यांनी संबंधितांना सूचना दिल्या की, मा. सदस्यांनी सुचविल्या-प्रमाणे किती जमिनीचे भूसंपादन होऊन मंडळाच्या ताब्यात आल्या आहेत, किती इमारतीचे बांधकाम सुरू आहे, महानगरपालिकेकडे किती इमारतीचे प्लॅन मंजूरीसाठी पडून आहेत, न्यायालयात किती जमिनींची प्रकरणे अडकून पडली आहेत इत्यादी माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी माहिती दिली की, श्री ईश्वर येसादे यांनी त्यांना एक पत्र दिलेले असून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ४०६-सी, पारसीवाडा येथे इमारत पुनर्रचित होऊनही अजून त्यांना गाळयांचा ताबा देण्यात आलेला नाही. त्यांनी पुढे अशी विचारणा केली की, इमारत पुनर्रचित होऊनही वितरणाशिवाय वर्षानुवर्षे तशीच पडून रहाते. त्यामुळे गाळयांची नासधूस होऊन मंडळास पुन्हा इमारती-साठी खर्च करावा लागतो. याबाबत पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी असे सांगून सदर इमारतीस त्यांना संबंधित अधिकाऱ्यांसह भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. यावर संबंधित अधिकारी श्री पालीवाल यांनी माहिती दिली की, सदर इमारत पुनर्रचित होऊन वर्ष झालेले आहे. परंतु तेथील आजूबाजूच्या रहिवाशांच्या हस्तक्षेपामुळे इमारतीस पाणीपुरवठा मिळालेला नाही. यावर मा. सभापती यांनी याबाबत लवकरात लवकर आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करून घेऊन शैक्षणिक वर्षाच्या दृष्टीने भाडेकरूंना गाळयांचे ताबे देणे संयुक्तिक होईल. जर आजूबाजूच्या रहिवाशांच्या हस्तक्षेपामुळे पाण्याची लाईन टाकणे शक्य नसेल तर पोलीसात फगुन्हा नोंदवून ते काम त्वरित करून घेण्यात यावे.

मा. सदस्य श्री उत्पकर यांनी अशी सूचना केली महानगरपालिकेचे पाणी पुरवठयाबाबतचे धोरण बदलण्याबाबत मंडळाने प्रयत्न करावयास पाहीजे. कारण सध्याच्या धोरणाप्रमाणे इमारतीत भाडेकरूंच्या $\frac{1}{3}$ पाणी पुरवठा केला जातो. म्हणजे इमारतीत ३० भाडेकरू असतील तर पाणी पुरवठा मात्र १० लोकांनाच मिळेल इतका असतो.

यावर मा. सभापती यांनी श्री पालीवाल यांना सूचना दिल्या की, उपमुख्य अभियंता यांच्याशी चर्चा करून पाणी पुरवठयाबाबत मंडळास येत असलेल्या अडचणींबाबत महानगरपालिका आयुक्त यांना पत्र लिहिण्यात यावे व महानगरपालिकेचे अधिकारी तसेच मंडळाचे मुख्य अधिकारी यांची एक बैठक घेण्यात यावी.

मा. सदस्य श्री उत्पकर यांनी माहिती दिली की, ३६-अ, बी. मुगभाट क्रॉस लेन या इमारतीत पाण्याचे कनेक्शन मिळालेले नसतानाही संबंधित भाडेकरूंना भाडे मात्र लावण्यात आले आहे. भाडे लावल्यानंतर पाण्याचे कनेक्शन देण्यात आले आहे. यावर संबंधित अधिकारी श्री तेरदाळकर यांनी, ज्या लोकांनी ताबे घेतले आहेत त्यांना पाणी मिळत नसल्याबाबत मंडळाकडे कधीही तक्रार केली नव्हती तसेच त्या इमारतीचे लोकांनी कडयाकुलपे तोडून गाळयात प्रवेश केला आहे, असे निदर्शनास आणले असता

२८

मा. सदस्य श्री उतपकर यांनी ही माहिती चुकीची असून इमारतीतील एकाही खोलीत टाळे नव्हते हे त्यांनी स्वत: व संबंधित अधिकारी यांनी पाहिलेले आहे असे सांगितले. यावर मा. सभापती यांनी सदर प्रश्न सोडविण्याबाबत संबंधितांनी लक्ष घालावे अशी सूचना केली.

मा. सदस्य श्री रेळे यांनी मागील बैठकीत इमारतीतील संडासाचा भाग लोखंड वापरुन दुरुस्त करण्याबाबत अभियंत्याची बैठक बोलाविण्यात येणार होती. त्याप्रमाणे बैठक घेण्यात आली का? अशी विचारणा केली असता मा. सभापती यांनी माहिती दिली की, बैठक झालेली असून बैठकीत असा निर्णय घेण्यात आला आहे की, जर रहिवाशी स्वत: कामे करुन घेत असतील व त्याप्रमाणे येणाऱ्या फरकाची रक्कम मंडळाकडे भरत असतील तर त्यांना त्याप्रमाणे दुरुस्ती करुन घेण्यास हरकत नाही. परंतु त्यांच्या कामाची जबाबदारी मंडळाने घेऊन तांत्रिक अडचणी वाढवू नयेत.

मा. सदस्य श्री खोपकर यांनी अशी विचारणा केली की, एखादी इमारत मंडळातर्फे दुरुस्त केल्यानंतर पुन्हा त्याच इमारतीची दुरुस्ती किती कालावधीनंतर करावयाची असते याबाबत काही निकष आहेत काय? कारण ते स्वत: रहात असलेली इमारत मंडळातर्फे दुरुस्तीसाठी घेण्यात आली होती परंतु इमारतींची दुरुस्ती बरोबर झालेली नाही अशी त्यांनी वारंवार तक्रार करुनही तक्रारीकडे दुर्लक्ष करण्यात आले. आता जर सदर इमारतीची दुरुस्ती करण्यात आली होती तर ती इमारत पुन्हा दुरुस्तीसाठी का घेतली? आणि जर त्या इमारतीची दुरुस्ती झाली नव्हती तर संबंधित ठेकेदाराला कामाचे पैसे कसे देण्यात आले? यावर उपमुख्य अभियंता [उत्तर], श्री भूवनदास यांनी खुलासा करताना सांगितले की, इमारतीतील ज्या भागाची दुरुस्ती करण्यात येते त्या भागाची दुरुस्ती पुन्हा दहा वर्षांपर्यंत करण्याची गरज नसते.

यावर मा. सदस्य श्री खोपकर यांनी असे निदर्शनास आणून दिले की, ते रहात असलेल्या इमारतीतील ज्या भागाची दुरुस्ती करण्यात आली होती त्याच भागाची पुन्हा चार वर्षानंतर दुरुस्ती करण्यात येत आहे. यावर उपमुख्य अभियंता यांनी याबाबत चौकशी करुन तपासणी अंतर कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिले.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी सूचना केली की, पावसाळ्यापूर्वीच्या सर्वेक्षणामध्ये धोकादायक म्हणून जाहीर करावयाच्या इमारतींबाबत वेळीच वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी तसेच सध्या महानगरपालिकेच्या स्वच्छता राखण्यासंबंधी योजना चालू आहेत. त्यादृष्टीने मंडळाच्या संक्रमण शिबीरातील नाल्यांच्या साफ-सफाईकडे लक्ष देण्यात यावे. विशेषत: वांद्रे[पश्चिम] येथील संक्रमण शिबीरात स्वच्छते बाबत समस्या आहेत. तसेच पुनर्रचित इमारतींच्या जवळपास जे डेब्रीज वर्षानुवर्षे पडून आहेत, ती उचलण्यात यावीत. त्यांनी पुढे अशीही सूचना केली की, मागील बैठकीत काही इमारतींची अंदाजपत्रके पुढे ढकलण्यात आली होती ती पुन्हा सादर करणे आवश्यक आहे.

मा. सभापती यांनी उ. मु. अभि. [द.]/[उ.] यांनी पावसाळ्यापूर्वी करण्यात आलेल्या सर्वेक्षणाची माहिती सभागृहास देण्यास सांगितले.

उपमुख्य अभियंता[द. ] श्री वनीकर यांनी माहिती दिली की, दक्षिण विभागाचे पूर्ण सर्वेक्षण करण्याची तारीख १५ मे १९९७ अशी आहे. आतापर्यंत म्हणजे ३० एप्रिल ९७ पर्यंत अ. विभागाचा सर्वे ८० टक्के, ब. विभागाचा सर्वे ८९ टक्के, सी१/सी२. विभागाचा सर्वे ७५ टक्के, सी३/सी४ विभागाचा सर्वे ७३ टक्के, डी-१ विभागाचा सर्वे ९४ टक्के, तरी डी-२ विभागाचा सर्वे ८४ टक्के आलेला आहे. एकंदर दक्षिण परिमंडळाचा सर्वे सरासरी ८२ ते ८३ टक्के आलेला आहे. तसेच महानगरपालिका व मंडळाच्या अधिका-यांच्या संयुक्त पहाणीनंतर धोकादायक इमारतींची यादी अंतिम करून ती वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येईल.

उपमुख्य अभियंता[उत्तर] श्री भूवनदास यांनी माहिती दिली की, ई-१ विभागाचा सर्वे ९२ टक्के आलेला आहे, ई-२ विभागाचा सर्वे ९४ टक्के, एफएस/जीएस विभागाचा सर्वे ९५ टक्के व एफएन/जीएन विभागाचा सर्वे ९३ टक्के आलेला असून एकूण सर्वे सरासरी ९४ टक्के आलेला आहे. संक्रमण शिबीरातील गाळयांच्या दुरूस्तीचे पावसाळयापूर्वीचे काम पूर्वीच सुरु करण्यात आलेले आहे.

मा. सदस्य श्री विश्वास राव यांनी असे निदर्शनात आणले की, वडाळा संक्रमण शिबीरातील नाल्यातून जो गाळ/कचरा बाहेर काढला जातो तो तेथेच ठेवला जातो त्यामुळे तो कचरा सगळीकडे पसरतो. तसेच अजूनही संक्रमण शिबीरातील नाले साफ करण्याचे काम सुरु करण्यात आलेले नाही, ते लवकरच करून घ्यावे.

यावर मा. सभापती यांनी सन्मा. सदस्यांनी मांडलेल्या वरील मुद्याबाबत एक परिपत्रक काढून संबंधितांना सूचना देण्यात याव्यात अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असे निदर्शनास आणले की, संक्रमण शिबीरातील गाळयांच्या छताला तडे गेले असून पावसाळयात लोक त्यामधून गळणारे पाणी थोपविण्यासाठी प्लास्टिकच्या पिशव्या/कागद बांधतात. देखभाल विभागाकडे दुरुस्तीची कामे करून घेण्यासाठी तक्रार करूनही लक्ष दिले जात नाही. कामे करण्यासाठी कर्मचारी-वर्गही उपलब्ध नाही अशी अवस्था आहे. तरी या गोष्टींकडे पावसाळयापूर्वी लक्ष देऊन सुधारणा करण्यात यावी.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, मागील बैठकीत सादर करण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली अंदाजपत्रके अजूनही आवश्यकता असताना सादर करण्यात आलेली नाहीत. उदा. १२५, कावसजी पटेल स्ट्रीट या इमारतीचे अंदाजपत्रक मर्यादित असणारे असूनही ते सादर करण्यात आलेले नाही. सदर इमारतीच्या रहिवाशांनी तशी विनंतीही केलेली आहे. त्यांनी सूचना केली की, दक्षिण विभागातील काही इमारतींच्या गनायटिंगचे काम करणे आवश्यक असून ते मर्यादित असणारे आहे. अशी कामे केली नाहीत तर लोकांना त्रास होणार आहे. म्हणून मर्यादित असणारी अशी कामे करून घेण्यास हरकत नाही. त्यास मा. सभापती यांनी

परिशिष्ट "अ"

दि. १४ /५/९७ रोजी झालेल्या बैठकीत मंजूर दरम्यान आलेल्या उत्तर परिमंडळातील दुरुस्ती-कामाच्या अंदाजपत्रकांची यादी

| अनु क्र. | विभाग | इमारतीचा तपशील | दुरुस्ती टप्पा / मंडळ / ना. ह. मं. | मजल्यांची संख्या / भाडेकरूंची संख्या | बांधकाम क्षेत्रफळ / दुरुस्ती दर चौ. मी. | अंदाजपत्रकाची रक्कम / निव्वळ टप्प्याची रक्कम | रु. ७५०/- चौ. मी. मर्यादितील रक्कम | रु. ७५०/- चौ. मी. वरील येणारी जादा रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
| १. | ई-१ | इ. क्र. ११-१३ हाथी बाग माझगांव | चौ. टप्पा / मंडळ | तळ+२ अंशत: / ४५+०=४५ | १०३०. ९९ / ७४१. २० | ७६४१६६. ०० / २१८८३६. ०० | रु २, १८, ८३६. ०० | - | मंजूर |
| २. | ई-१ | इ. क्र. २६ तलेकत रोड, ९, पालनजी रतनजी चाळ | ति. टप्पा / मंडळ | तळ+२ / ७२+०=७२ | १४५१. ११ / ५६०. ३६ | ८१३१९८. ०० / ६०४२३५. ०० | रु ६, ०४, २३५. ०० | - | जुने क्षेत्रफळ १३५३.५६ चौ. मी. धरुन मंजूर |
| ३. | ई-१ | इ. क्र. ४६-५० कलेअर रोड लक्की मेन्शन भायखळा | चौ. टप्पा / मंडळ | तळ+४ / ३०+२=३२ | १४९६. ०० / ६६२. ८२ | ९९१५७९. ०० / २७१६५३. ०० | रु २, ७१, ६५३. ०० | - | मंजूर |
| ४. | ई-१ | इ. क्र. ४३-५१ सोफीया झुबेर रोड | चौ. टप्पा / मंडळ | तळ+२ / २५+४=२९ | १०२७. ४० / ६३०. ९८ | ६४८३३८. ०० / २१४१९५. ०० | रु २, १४, १९५. ०० | - | मंजूर |
| ५. | ई-१ | इ. क्र. ५०-५८ अकोलावाला चाळ, डॉ. बी. ए. रोड | ति. टप्पा / मंडळ | तळ+४ / ३६+५=४१ | ११३१. ०१ / ८९०. ५३ | १००७२२४. ०० / ५०३३४६. ०० | रु ३, ४४, ३६२. ५० | रु १, ५८, २७६. ५० | रहिवाश्यांनी त्यांच्या हिश्श्याची ५०% आधी कर्ची रक्कम भरण्याच्या अटीस आधीन राहून मंजूर. |
| | | | | | एकूण | ४२२४५३५. ०० / १८१२२६५. ०० | रु १६, ५३, २८८. ५० | रु १, ५८, २७६. ५० | |

ई-२.

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ई-२ | इ. क्र. ८६७ बी. जे. मार्ग स्टोन बिल्डींग | चौ. टप्पा / मंडळ | तळ+-३ / ८४+-२७=१११ | ४०५५. ८७ / ७१९. १४ | २९१६७७२. ०० / ६६०७३३. ०० | रु ६, ६०, ७३३. ०० | - | मंजूर |
| ७ | ई-२ | इ. क्र. २० कामाठीपुरा ७वी गल्ली | प. टप्पा / मंडळ | तळ+-१ / ७+-१=८ | १२५. २२ / ६८५. ०० | ८५८७६. ०० / ८५८७६. ०० | रु ८५, ८७६. ०० | - | —॥— |
| ८ | ई-२ | इ. क्र. ६१२-६१४ एन. एम. जोशी मार्ग | चौ. टप्पा / मंडळ | तळ+-३ / २५+-६=३१ | ९०१. १५ / ८२९. १५ | ७४७१९२. ०० / ३०८६५८. ०० | रु २, ३५, ३२८. ५० | रु ७१, ३२९. ५० | —॥— |
| ९ | ई-२ | इ. क्र. ३९ कामाठीपुरा ६वी गल्ली | प. टप्पा / मंडळ | तळ+-२ / २+-१=३ | ७६. ३१ / १४९१. ६६ | ११३८२९. ०० / ११३८२९. ०० | रु ५७, २३२. ५० | रु ५६, ५९६. ५० | —॥— |
| १० | ई-२ | इ. क्र. १२७-१४१ एम. ए. रोड | प. टप्पा / मंडळ | तळ+-२ / ७+-२=९ | २३५. ८६ / ५५९. ६७ | १३१९८७. ०० / १३१९८७. ०० | रु १, ३१, ९८७. ०० | - | —॥— |
| ११ | ई-२ | इ. क्र. १५३-१५३ अे, एम. ए. रोड, फतिया मंझिल | प. टप्पा / मंडळ | तळ+-१ / ८+-४=१२ | २६७. ३९ / ८२५. १५ | २२०६३८. ०० / २२०६३८. ०० | रु २, ००, ५४२. ५० | रु २०, ०९५. ५० | —॥— |
| १२ | ई-२ | इ. क्र. ५० कामाठीपुरा १३वी गल्ली | दु. टप्पा / मंडळ | तळ+-२ / ११+-१=१२ | १८८. ७६ / ७३१. ६९ | १३८११४. ०० / ९२६४८. ०० | रु ९२, ६४८. ०० | - | —॥— |
| | | | | | एकूण | ४३५४३७८. ०० / १६१४३६९. ०० | रु १४, ६६, ३४७. ५० | रु १, ४८, ०२१. ५० | |

सुधारीत अंदाजपत्रक

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | ई-२ | इ. क्र. २४-२६ जेल रोड | ति. सुधा. टप्पा / मंडळ | तळ+-३ / ११५+-१७=१३२ | ४१६७. ३८ / ७४२. ५४ | ३०९४४४७. ०० / २०४२०८४. ०० | रु २०, ४२, ०८४. ०० | - | दुरुस्ती उपकर पूर्ण भरल, केलेल्या पूर्ततेचा अहवाल सादर करण्याच्या अधीन अधीन राहून मंजूर |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | फग[द] | इ. क्र. १०७–१२७ हरी बाग, सन मिल लेन | ति. टप्पा / मंडळ | तळ+–२ / १०४+–८=११२ | २७९७.२० / ६७०.७१ | १८७६१२२.०० / १००४८५९.०० | १००४८५९.०० | – | मंजूर |
| १५ | फग[द] | १८ ई शबीयाबी बिल्डींग गोखले सोसायटी लेन | ति. टप्पा / मंडळ | तळ+–३ / ४४+–२=४६ | ९८०.२३ / ७७१.७१ | ७५६५६३.०० / ६८३४९१.०० | ५२२२१०.२१ | २१२००.७९ | —॥— |
| १६ | फग[द] | ६ अे अे बहारी बिल्डींग क्र. १ झकेरीया बंदर रोड | प. टप्पा / मंडळ | तळ+–४ / २१+–३=२४ | ८५५.३६ / ३८०.७८ | ३२५७१२.०० / ३२५७१२.०० | ३२५७१२.०० | – | —॥— |
| १७ | फग[द] | २३७ सुपारीवाला मॅनशन डॉ, बी. आंबेडकर रोड | ति. टप्पा / मंडळ | तळ+–४ / २१+–९=३० | १८३१.०० / ७१०.०७ | १३००१४७.०० / ५३७२८१.०० | ५३७२८१.०० | – | —॥— |
| | | | | | | ४४२५८४४.०० / २२४११३४३.०० | २३२०१४२.२१ | २१२००.७० | |

(पुढे चालू)

३०

फ-ग (उत्तर)

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | फ़[उ] | १०९ सार्ईसदन भवानी शंकर रोड, दादर [प] | प. टप्पा / मंडळ | तळ+-१ / ३+-०=३ | ३८९. २९ / ७८७. ८५ | २२७९१८. ०० / २२७९१८. ०० | २१६९६७. ५० | १०९५०. ५० | शौचालयांची अधिक रक्कम भरल्याच्या अटीस अधीन राहून मंजूर. |
| १९ | फ़[उ] | १० डि. एल. वैदय रोड दादर [प] | दु. टप्पा / मंडळ | तळ+-२ / ५+-०=५ | २०९. ४३ / ९०१. ५३ | १८८८०७. ०० / १६३७९१. ०० | १३२०५६. ०० | ३१७३५. ०० | मंजूर |
| २० | फ़[उ] | ६८, पठाण मंझील, दरगा स्ट्रीट, माहिम, मुंबई | चौ. टप्पा / मंडळ | तळ+-२ / १८+-९=२७ | ६१२. २३ / ७२४. ०८ | ४९२२७९. ०० / २१९९५८. ०० | १९२१२६. ५० | २७३३१. ५० | —॥— |

अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी सादर करण्यांत आलेल्या व त्यांना मंजूरी दिलेली अंदाजपत्रकांची यादी.

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | फ़[द] | ८९८ ग्लोब मिल पॅसेज पांडुरंग बुधकर मार्ग. | दु. टप्पा / मंडळ. | तळ+-१ / ७+-४=११ | ३६२. ४० / ८३५. ३७ | ३,०२,७४०. ०० / २,५१,३३२. ०० | — | ३०९४०. ०० | |
| २. | फ़[द] | खिमजी चाळ क्र. २ तुलसी पाईप रोड. | ति. टप्पा / मंडळ | तळ+-२ / १३०+-३=१३३ | २३९२. ०० / ६५३. १२ | १५,६२,२७०. ०० / १२,१७,२०९. ०० | — | — | |
| ३. | फद-गद | २-६ एलफिस्टन रोड श्री. समर्थ निवास | ति. टप्पा / मंडळ. | तळ+-३ / २३+-११=३४ | ११६२. ५४ / ४९२. ६७ | ६,२२,०१५. ०० / ३,२७,०४४. ०० | — | — | |
| ४. | इ-२ | १८-१९ ई भायखळा स्टेशन रोड. | प. टप्पा / मंडळ | तळ+-२ / २५+-११=३६ | ९८९. ७० / ६७४. ७० | ६,६७,७५४. ०० / ६,६७,७५४. ०० | — | — | |

सूचना- मा. सभापती यांनी अशा सूचना दिल्यात की,-या-पुढील बैठकीत सादर करण्यापूर्वी रिकाम्या जागाची पूर्तता करण्यांत यावी व संबंधित अधिका-यांनी त्याची खात्री करावी.

दिनांक १४.५.९४ रोजी झालेल्या मंडळाच्या बैठकीत मंजूर केलेल्या दक्षिण परिमंडळातील अंदाजपत्रकाची यादी. परिशिष्ट-ब

| अ.क्र. | विभाग | इमारतीचा तपशील | दुरुस्तीचा टप्पा. मंडळ/नाहप्र. | मजल्यांची संख्या. नि+अ=एकूण | बांधकाम क्षेत्रफळ दर चौ.मि. खर्च. | अंदाजपत्रकाची एकूण रक्कम. निव्वळ टप्प्याची रक्कम | रु. ७५०/-चौ.मि. मर्यादितील रक्कम | जादा रक्कम | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| [१] | [२] | [३] | [४] | [५] | [६] | [७] | [८] | [९] | [१०] |
| | "अ" विभाग | | | | | | | | |
| १] | "अ" | २५-२७, नवरोजी स्ट्रिट | पहिला मंडळ | तळ+-२<br>६+-२=८ | २२८.२४<br>७१४.८८ | १६३१६५/-<br>१६३१६५/- | १६३१६५/- | — | मंजूर |
| २] | -"- | २९ पोलिस कोर्ट लेन | पहिला मंडळ | तळ+-५<br>२+-४=६ | ३०५.४०<br>१३०७.४४ | ३९९२९४/-<br>३९९२९४/- | २२९०५२/- | १७०२४२/- | अधिकची रक्कम भरण्या-च्या अटीस अधिन राहून मंजूर. |
| ३] | -"- | १६-१८९, पिठा स्ट्रिट | दुसरा मंडळ | तळ+-५<br>४+-२=६ | ३०५.५०<br>९४४.७९ | २८८६२७/-<br>२६५२०९/- | २०५७०१/- | ५९५०८/- | मंजूर |
| ४] | -"- | ३१-३३-३५, राजवाडकर स्ट्रिट | चौथा मंडळ | तळ+-४<br>२५+-२=२७ | ५४८.३०<br>९०८.६७ | ४९८२२५/-<br>२३०९७९/- | १४३९८०/- | ८६९९९/- | अधिकची रक्कम भरण्याच्या अटीस अधिन राहून मंजूर. |
| ५] | -"- | ९३ मोदी स्ट्रिट | तिसरा मंडळ | तळ+-४<br>७+-३=१० | ४१८.१९<br>१८७९.५५ | ७८६०११/-<br>५७६९१८/- | १०४५५१/- | ४७२३६७/- | मंजूर |

1635565

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **बी- विभाग** | | | | | | | | | | |
| १] | "बी" | १२ केशवजी नाईक रोड, | तिसरा मंडळ | बेसमेंट+-तळ ३१+-११=४२ | २११९.५८ ६५०.०० | १३७७७४७/- ४५०६४४/- | ४५०६४४/- | — | — | मंजूर |
| २] | -"- | १६५-१६७, सॅम्युअल स्ट्रिट | दुसरा मंडळ | तळ+-३ ११+-९=२० | १०१३.७० २८४.३६ | ३८९६२७/- २६४४९९/- | २६४४९९/- | — | — | -"- |
| ३] | -"- | ५३ नेल रोड, वाधे | दुसरा मंडळ | तळ+-३ ७+-०=७ | ३२५.८४ ७३१.०० | २३८१९१/- १७५५४१/- | १७५५४१/- | — | — | -"- |
| ४] | -"- | १३ ई-चकाला क्रॉस लेन | दुसरा नाहप्र | तळ +-२ १३+-२=१५ | ३३८.२३ ११३३.६८ | ६२०२०८/- ४७६१०८/- | ३४६३३६/- | १२९७७२/- | — | -"- |
| ५] | -"- | ४३-४७, कोळसा स्ट्रिट | पहिला मंडळ | तळ+-४ ५+-७=१२ | ४८८.०० ७३०.४४ | ३५६४५५/- ३५६४५५/- | ३५६४५५/- | — | — | -"- |
| ६] | -"- | ४६-अ, ४६-बी, तांडेल स्ट्रिट | तिसरा मंडळ | तळ+-३ १८+-३=२१ | ४२७.४५ ७२९.६९ | ३६२९८७/- १११५५७/- | १११५५७/- | — | — | -"- |

विदे/३१५९७.

सी-३/४ विभाग :

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | सी-३/४ | १५९-[१३] कॅव्हल क्रॉस लेन नं. ६. | दुसरा मंडळ. | तळ+-२<br>७+-२=९ | १९८.२९<br>७२३.६२ | १४३४८६/-<br>१०३४८६/- | १०३४८६/- | — | मंजूर |
| २] | -"- | ३३ दुसरी मरिन स्ट्रिट | दुसरा मंडळ | तळ+-२<br>६+-०=६ | २३१.३८<br>७२८.०१ | १६८५२१/-<br>१३७५५२/- | १३७५५२/- | — | -"- |
| ३] | -"- | १९१-अ, कॅव्हल क्रॉस लेन नं. ९ | दुसरा मंडळ | तळ+-४<br>१३+-४=१७ | ६७६.८२<br>७१८.८६ | ४८६५३८/-<br>३५४६६०/- | ३५४६६०/- | — | मंजूर |
| ४] | -"- | १०४-बी, सिताराम पोदार मार्ग. | दुसरा मंडळ | त+-३<br>४+-0=४ | २३५.०२<br>६१५.८६ | १४४७३८/-<br>११९४९७/- | ११९४९७/- | — | -"- |

715145/-

विदे/३१५९७.

84

डी-१-विभाग :

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | डी-१ | २७६-बी. जे. एस. एस. रोड | तिसरा मंडळ | तळ+-३+-ॲटीक ७+-८=१५ | १४५७.०० १२२१.२५ | १६२३६६४/- १२२१२१९/- | ६८०२०८/- | ५४०९११/- | मंजूर |
| २] | -"- | ४६८-४७८, एस. व्ही. पी. रोड. | तिसरा मंडळ | तळ+-४ १३+-८=२१ | २४४७.३० ७३५.४३ | १५९९८३१/- ६९०५७१/- | ६९०५७१/- | —— | -"- |
| ३] | -"- | ५-५५, खत्तर अली लेन | पहिला मंडळ | तळ+-३[अंशत:] ८+-४=१२ | ६३२.८६ ४४९.१६ | २८४२५९/- २८४२५९/- | २८४२५९/- | —— | -"- |
| ४] | -"- | ३४ आय. मुगभाट क्रॉस लेन | तिसरा मंडळ | तळ+-२ १२+-०=१२ | ३८८.५० ८५८.८८ | ३३३६७५/- २१५४३५/- | १७३१३५/- | ४२३००/- | -"- |
| ५] | -"- | ५१, अ. के. मार्ग | दुसरा मंडळ | तळ+-१ ९+-७=१६ | २९२.८४ ७४७.३२ | २१६७५४/- १४१७९४/- | १४१७९४/- | — | -"- |
| ६] | -"- | १०३-१०५-१०७, अे, तिस, तात्या घारपुरे पथ | तिसरा मंडळ | तळ+-२ ११+-४=१५ | ७६७.५० ७०७.३४ | ५४३८८७/- २१४८५८/- | २१४८५८/- | — | -"- |

2768136

विदे/३१५९७.

डी-२ विभाग :

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | डी-२ | १३१, ताडदेव रोड | पहिला<br>मंडळ | तळ+-३+-भाग-४<br>९+-३=१२ | ११७४.६९<br>४९०.५१ | ५७६२०५/-<br>५७६२०५/- | ५७६२०५/- | — | मंजूर |
| २] | -"- | ५ फोर्जेट हिल रोड | तिसरा<br>मंडळ | तळ+-३<br>२४+-०=२४ | ९७५.७८<br>७३०.१४ | ७१२४५७/-<br>४०३१२०/- | ४०३१२०/- | — | -"- |
| ३] | -"- | ३१५-३१७, फॉकलंड रोड | तिसरा<br>मंडळ | तळ+-भाग २<br>५४+-२=५६ | १२१५.९७<br>७३९.०५ | ८९८६६३/-<br>६०२३९१/- | ६०२६९१/- | — | -"- |
| ४] | -"- | २५ बाळाराम स्ट्रिट | दुसरा<br>मंडळ | तळ+-३<br>१३+-०=१३ | ५९५.३८<br>७४६.१७ | ४४४४७९/-<br>२७९४७९/- | २७९४७९/- | — | -"- |
| ५] | -"- | ६ किल्लेन, शामराव विठ्ठल मार्ग. | पहिला<br>मंडळ | तळ+-३+-४भाग<br>२१+-३=२४ | ७११.२५<br>७३३.३५ | ५२७४६३/-<br>५२७४६३/- | ५२५४६३/- | — | -"- |
| ६] | -"- | ३२-अे, बाळाराम स्ट्रिट | दुसरा<br>मंडळ | तळ+-३<br>८+-४=१२ | ६९६.४२<br>५१०.६४ | ३५५६२१/-<br>२६० ६२१/- | २६०६२१/- | — | -"- |
| ७] | -"- | २०८-२१०, खेतवाडी मेन रोड | तिसरा<br>मंडळ | तळ+-भाग ४<br>६१+-२=६३ | १६५०.६५<br>६२५.४० | ११४७८६७/-<br>४४७७०६/- | ४४७७०६/- | — | -"- |
| ८] | -"- | ३०-अे, अल्टामाऊंट रोड | पहिला<br>मंडळ | तळ+-१<br>१६+-०=१६ | ३०७.८२<br>६१६.९३ | १८९९०३/-<br>१८९९०३/- | १८९९०३/- | — | -"- |
| ९] | -"- | १४-१६, शंकर शेठ मार्ग | तिसरा<br>मंडळ | तळ+-भाग २+-भाग३<br>२९+-२ =३१ | १२६३.४१<br>७४३.२३ | ९३९०१०/-<br>३९९५५४/- | ३९९५५४/- | — | -"- |

विदे: ३१५२७.

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १०] | डी-२ | ४२ अ. कोर्जेट स्ट्रिट | तिसरा मंडळ | तळ+-भाग ४<br>४+-४=८ | ८०६.५०<br>३८०.१० | ३०५४१२/-<br>२२४५८९/- | २२४५८९/- | ---- | मंजूर |
| ११] | -"- | १९७-अ, डॉ. भडकमकर मार्ग. | दुसरा[सु] मंडळ | तळ+-३<br>७+-१=८ | ६८२.०१<br>१००७.४९ | ६८७१२३/-<br>५४५८२५/- | ३७०२१४/- | १७५६११/- | -"- |
| १२] | -"- | १-अ, उरणवाला स्ट्रिट | पहिला[सु] मंडळ | तळ+-४<br>१७+-०=१७ | १०९९.२१<br>७४९.१० | ८२३४२०/-<br>८२३४२०/- | ८२३४२०/- | ---- | -"- |
| १३] | -"- | ७६-७६, बी. खेतवाडी १० वी गल्ली. | दुसरा[सु] मंडळ | तळ+-१ | ६७८.४१<br>७०२.८३ | ४७६८०७/-<br>३८१८१३/- | ३८१८१३/- | ---- | -"- |

5762089

मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी सादर करण्यात आलेल्या व त्यांना मंजूरी दिलेल्या अंदाजपत्रकाची यादी.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | सी-३-४ | २०३, काळबादेवी मार्ग | चौथा[सु] मंडळ | तळ+-२<br>३७+-२२ | २७३१.००<br>२६४.९६ | २६३५२९६/-<br>१३२४३९२/- | | - | मंजूर |
| २] | डी-१ | १२, निकदवारी लेन | चौथा मंडळ | तळ+-२<br>२११+-४ | ४०२.००<br>८८७.१० | ३५६६१६/-<br>१६५१११/- | | | मंजूर |
| ३] | डी-१ | ६ निकदवारी लेन | चौथा मंडळ | तळ+-२<br>२९+-२ | ११३०.००<br>७७७.०६ | ८७८०८२/-<br>१८४१०६/- | | | मंजूर |